**शासकीय पत्रे निर्गमित करताना स्वाक्षरीखाली**
**कंसामध्ये नाव व पदनामाचा उल्लेख करण्याबाबत.**

2016011111243557O7

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-१००५/५६६/प्र.क्र.३०/२००५/१८ (र.व का.)**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :१६जून,२००५.**

## परिपत्रक

शासकीय कार्यालयातून पत्र निर्गमित करतेवेळी त्या पत्रावर संबंधित अधिकारी स्वाक्षरी करतात व त्या खालीच नाव लिहितात किंवा त्याच्या वतीने ज्यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी स्वाक्षरी करतात. परंतु "करीता" असा उल्लेख करुन स्वाक्षरीखाली स्वतःचे नाव लिहित नाही. परिणामी त्या अधिका-याची ओळख पटत नाही. काही प्रकरणात अधिकारी किंवा त्याच्या वतीने "करीता" म्हणून स्वाक्षरी करणारा अधिकारी बदली झाल्यास त्याची माहिती घेण्यासाठी फार कसरत करावी लागते असे शासनाच्या निदर्शनास आणले आहे.

मंत्रालयीन विभागातून निर्गमित होणा-या प्रत्येक पत्रावर स्वाक्षरी खाली कंसामध्ये अधिका-याचे नाव व त्याखाली त्याचे पदनाम लिहिण्याची जी पध्दत आहे त्याप्रमाणे राज्यातील सर्व शासकीय कार्यालयामधून पत्र निर्गमित करतेवेळी प्रत्येक पत्रावर स्वाक्षरी खाली कंसामध्ये स्वाक्षरी करणा-या अधिका-याचे नाव व त्याखाली त्याचे पदनाम लिहिण्याची सूचना देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संजय ढवळे)
सचिव (प्र.सु.व र.व का.व वि.प्र.)

प्रति,

१.राज्यपालांचे सचिव,
२.मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, (२ प्रती)
३.मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
४.सर्व मंत्री / राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक,
५.मा.मुख्य सचिवांचे उप सचिव,
६.सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
७.सर्व मंत्रालयीन विभाग,
८.मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख / कार्यालय प्रमुख.
९.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.
१०.निवड नस्ती.